RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ८, अंक ४०(२)] गुरुवार, मे १२, २०२२/वैशाख २२, शके १९४४ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ८६**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**गृह विभाग**

दुसरा माळा, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १२ मे २०२२

**अधिसूचना**

**मोटार वाहन अधिनियम, १९८८.**

क्रमांक एमव्हीआर-०५१९/प्र.क्र.८०/परि-२.— मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) याच्या कलम ९६ च्या पोट-कलम (२) च्या खंड (दहा) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि त्या बाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ च्या नियम ९० च्या उप नियम (६) मध्ये केलेल्या सुधारणेच्या अधिन राहुन महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रस्तावित केलेल्या पुढील नियमांचा मसुदा उक्त अधिनियमाच्या कलम २१२ च्या पोट-कलम (१) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, यामुळे बाधा पोहचण्याची शक्यता असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीसाठी, याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे आणि याद्वारे अशी सूचना देण्यात येत आहे की, ज्या दिनांकास अधिसूचनेचा मसुदा **शासन राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल त्या दिनांकापासून तीस दिवसानंतर, प्रस्तावित प्रारूप नियम महाराष्ट्र शासनाकडून विचारात घेण्यात येईल :—

२. उपरोक्त तारखेपुर्वी उक्त मसुद्याच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती किंवा सूचना, परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, ५ वा मजला, फाऊंटन टेलिकॉम बिल्डिंग क्र.२, हुतात्मा स्मारक चौक, एम.जी. रोड, मुंबई ४०० ००१, यांच्याकडे येतील, त्यावर शासन विचार करील.

**प्रारूप नियम**

१. या नियमास, महाराष्ट्र मोटार वाहन (सुधारणा) नियम, २०२२ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ७८ मधील पोट नियम (४) हा पोट नियम (५) म्हणून पुनर्क्रमांकीत करण्यात येईल.

३. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ७८ च्या उप नियम (३) नंतर उप नियम (४) नव्याने दाखल करण्यात येईल :—

"(४) महाराष्ट्र राज्याव्यतिरिक्त अन्य राज्यातील प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने किंवा राज्य परिवहन प्राधिकरणाने जारी केलेल्या राष्ट्रीय परवान्यावरील मालवाहू वाहनास महाराष्ट्र राज्यांतर्गत असलेल्या दोन ठिकाणांच्या अधेमधे माल भरुन घेता किंवा उतरविता येणार नाही."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**राजेंद्र होळकर,**
शासनाचे सह सचिव.

**HOME DEPARTMENT**

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 12th May, 2022.

*NOTIFICATION*

MOTOR VEHICLES ACT, 1988.

No.MVR0519/C.R.80/TR-2.— The following draft of the rules, to further amend the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989, which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by clause *(x)* of sub-section (*2*) of section 96 of the Motor Vehicles Act, 1988 (59 of 1988), by provisions as per amendment in sub rule (6) of rule 90 of Central Motor Vehicles Rules, 1989 and of all other powers enabling it in this behalf, hereby published as required by sub-section (*1*) of section 212 of the said Act, for information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra after thirty days from the date on which this draft notification is published in the *Official Gazette ;*

2. Any objections or suggestions which may be received by the Transport Commissioner, Maharashtra State 5th Floor Fountain Telephone Bhavan-2, Mahatma Gandhi Marg, Fort, Mumbai 400 001. from any person with respect to the said draft on or before the aforesaid period will be taken into consideration by the Government.

DRAFT RULES

(1) These rules may be called the Maharashtra Motor Vehicles (Amendment) Rules, 2022.

(2) The sub rule *(4)* of rule 78 of the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989, shall be renumbered as sub rule *(5)* of the said rule.

(3) Sub rule *(4)* shall be newly inserted after sub rule (3) of rule 78 of the Maharashtra Motor Vehicles Rules, 1989 as follows :—

"(4) a goods vehicle covered by national permit issued by any Regional Transport Authority or State Transport Authority other than in the State of Maharashtra shall not pick up or set down goods between two points in the State of Maharashtra".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJENDRA HOLKAR,
Joint Secretary to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.